NAAC Accredited-2022
"B++" Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://www.sus.ac.inई-मेल:, registrar@sus.ac.inbos@sus.ac.in

**पी.जी.प्रवेश विभाग**


## परिपत्रक क्र. ६

वाचा.- जा.क्र.पुअहोसोविसो/पवमुमं/पी.जी.प्रवेश/२०२५/ १२०६, दिनांक : २१/०६/२०२५

प्रस्तुत विद्यापीठ सलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्य व संकुल संचालक यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकानुसार सर्व सलग्नित महाविद्यालये व संकुलांना मा. उपसचिव, राजभवन, मुंबई यांचे पत्र क्र. RB/gen-२०२४/CR ९२८/Edn.५/३५७ दि. १७/०४/२०२५ नुसार सर्व पदवी अभ्यासक्रमांसाठी ७५% विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य असल्याने उपस्थितीकरिता Biometric Digitally Submit to University System राबविली जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी ७५% उपस्थिती असणे अनिवार्य असल्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर Learning Management System प्रणाली दि.०१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत सर्व पदवी (UG) महाविद्यालयामध्ये विकसीत करण्यात यावे. Biometric Machine Specification माहितीस्तव सोबत जोडले आहे. त्याकरिता आवश्यक सहकार्य विद्यापीठामार्फत केले जाईल. यासंदर्भातील अधिक माहितीकरिता १) ९९८७७९६३७० २) ८६६८२९५८०७ या नंबरला संपर्क साधून दि. ०१ ऑक्टोबर,२०२५ पर्यंत सदरची प्रणाली महाविद्यालयात विकसित करण्यात येईल, असे हमीपत्र विद्यापीठाकडे दि. ३०/०६/२०२५ रोजी पर्यंत admissionpg@sus.ac.in या ईमेल आयडीवर सॉफ्टकॉपी व हार्ड कॉपी प्रत्यक्ष विद्यापीठात जमा करण्यात यावे, असे कळविण्यात आले होते. त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून आलेली नाही.

सर्व सलग्नित महाविद्यालये व संकुले यांना या परिपत्रकाव्दारे पुन:श्च एकदा कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता Learning Management System प्रणाली बंधनकारक करण्यात आलेली आहे. आपल्या महाविद्यालयात व संकुलामध्ये Learning Management System प्रणाली करिता Biometric Machine बसविण्यात आले असल्याबाबतचे पत्र दि. १५/०६/२०२६ पर्यंत admissionpg@sus.ac.in या ईमेलवर पाठविण्यात यावेत. तसेच दि. २२/०६/२०२६ पर्यंत हार्ड कॉपी विद्यापीठास (पी.जी. प्रवेश विभाग श्री. शंकर स्वामी) यांच्याकडे जमा करण्यात यावे.

(P.T.O)

तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चे सर्व पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे हजेरी ही Learning Management System प्रणाली मार्फत घेऊन दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत विद्यापीठास lmsreport@sus.ac.in या ईमेलवर जमा करणे अनिवार्य आहे. अन्यथा विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म तयार होणार नाही. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांस परीक्षेस बसता येणार नाही. सबब,LMS व्दारे हजेरी जमा करून विद्यार्थ्यांचे नुकसान टाळणे ही महाविद्यालय व संकुलाची जबाबदारी आहे.

(डॉ. अतुल लकडे)
प्रभारी कुलसचिव

जा.क्र.पुअहोसोविसो/पी.जी.प्रवेश/२०२६/5169
दिनांक : - 5 JUN 2026

प्रति,
सर्व महाविद्यालयातीय प्राचार्य व सर्व संकुल संचालक, प्रस्तुत विद्यापीठ सलग्नित यांना कार्यवाहीस्तव